# मेट्रो ३ मार्गिकेच्या रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास

फोटो स्टोरी

दत्ता खेडेकर

कुलाबा ते सीप्झ मेट्रो ३ मार्गिकेचे काम जवळपास मागील आठ वर्षांपासून सुरू आहे. या मार्गिकेच्या स्थानकांच्या कामासाठी मुंबईत जागोजागी रस्ते अडविण्यात आले होते. परिणामी, या भागात वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत होते. मात्र, आता मेट्रो मार्गिकेची कामे पूर्णत्वाच्या दिशेने निघाली आहेत. त्यामुळे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) रस्ते पुन्हा पूर्ववत करण्याचे काम सुरू केले आहे. त्यामुळे मुंबईतील वेगवेगळ्या भागातील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे.




प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मंदिराजवळील मैदान मेट्रो कामासाठी घेण्यात आले होते. आता हे मैदानही पूर्ववत करण्यात आले आहे. तसेच या ठिकाणी वृक्ष लावण्यात आले आहेत. तसेच हिरवळ साकारली आहे.




माहीम येथील शितळादेवी मंदिर परिसरातील रस्ताही गेल्या काही वर्षांपासून अर्धा बंद करण्यात आला होता. आता हा रस्ता पूर्ववत करण्यात आल्याने या भागात होणारी कोंडी मिटली आहे.




दादर येथील गोखले रस्त्याच्या ३०० मीटरचा भागही वाहतुकीसाठी नुकताच खुला करण्यात आला आहे. त्यातून वाहनांना मोठा दिलासा मिळाला आहे. यातून या भागातील वाहतूक सुरळीत होण्यात मोठी मदत मिळणार आहे.




फोर्ट परिसरातील हुतात्मा चौकातील डी. एन. रस्ता मेट्रो ३च्या कामासाठी बंद करण्यात आला होता. आता या रस्त्याचा ३९० मीटर लांबीचा भाग पुन्हा वाहतुकीसाठी पूर्ववत करण्यात आला आहे.




चर्चगेट रेल्वे स्थानकाबाहेर अहिल्याबाई होळकर चौकातील काही भाग मेट्रो स्थानकाच्या कामासाठी अडविण्यात आला होता. आता हा भागही पूर्ववत करण्यात आला असून मोकळ्या जागेत वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.